**सीएनआर एमएचएनबी–०९.०००६३९–२०२३**
**नियमित दिवाणी दावा क्रं. ११/२०२३**
**मणिलाल राऊळ .... वि.... मगन राऊळ**

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश
**(दिनांक ११/०९/२०२३)**

वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादींविरुध्द आदेशिका ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तास मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे. सदर दाव्यात खाली नमुद केलेल्या मिळकतीवरील वादीच्या ताब्यास प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये म्हणुन वादीने प्रतिवादींविरुध्द अंतिम निकाल लागेपावेतो वादी यांना तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणे करीता सदरचा अर्ज केलेला आहे.

**२. वाद मिळकतीचे थोडक्यात वर्णनः–** मौजे शिर्वे, ता. तळोदा, जि. नंदुरबार येथील खासरा/खंड क्रं. ४४५ क्षेत्रफळ ० हेक्टर ५० आर जिच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेतः–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | भगता गेवला वळवी |
| पश्चिमेस | – | पितांबर रुपसिंग राउळ |
| दक्षिणेस | – | हुचौ भाग |
| उत्तरेस | – | नाजु नोथु वसावे |

वर नमुद वर्णनातील शेतजमीन हा प्रस्तुत अर्जाचा वाद विषय असुन, त्यास पुढे ''दावा मिळकत'' किंवा ''वाद मिळकत'' असे संबोधण्यात येते.

३. **वादींचे थोडक्यात कथनः—** वादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा एकमेकांशी कुठलाही नातेसंबंध नाही. दावा मिळकत ही अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ नियम २००८ च्या तरतुदी नुसार मा. अप्पर जिल्हाधिकारी यांच्या आदेश क्रं. १३४२ दि.१९.०१.२०१८ च्या आदेशानुसार वैयक्तिक वनहक्क दावा मंजुर करुन वादींच्या नावे कायदेशीर मालक व कब्जेदार म्हणून देण्यात आली आहे. प्रतिवादींचा दावा मिळकतीशी काही एक हक्क संबंध नसतांना दि.२१.०६.२०२३ रोजी प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे दावा मिळकतीत प्रवेश करुन काड्या कचरा उचलण्यास सुरुवात केली. वादी यांना पिकपेरा करण्यास हरकत अडथळा केला तर जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वादीने दि.०४.०७.२०२३ रोजी पोलिस निरीक्षक, तळोदा व पोलिस अधिक्षक, नंदुरबार यांना तक्रारी अर्ज दिला. तसेच दि.०५.०७.२०२३ रोजी सोयाबीन पिकाची पेरणी करतांना प्रतिवादींनी जबरदस्तीने वादीला बेकब्जा करण्याचा प्रयत्न केला. वादीला दावा मिळकती शिवाय दुसरे कोणतेही उपजिवीकेचे साधन नाही. प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकती वरील ताब्यास कोणताही हक्क संबंध नसतांना सतत हरकत अडथळा करीत आहे. प्रतिवादीचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क संबंध नसतांना वादीच्या ताब्यामध्ये अडथळा निर्माण केल्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

४. सदरच्या दाव्यात प्रतिवादी यांनी हजर होवुन त्यांचा लेखी जबाब (नि.क्रं.१४) दाखल केला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादीचा प्रस्तुतचा दावा तसेच

अर्ज मुळातच पात्र नाही. वादीने दावा मिळकतीची वनहक्क विषयीची माहिती बेकायदेशिर दिलेली असुन ती एकतर्फी आहे. वादी यांना केव्हाही वनहक्क दावा मंजुर झाला नाही. वादीने वनहक्क समिती, वनहक्क विभाग यांना आवश्यक ते पक्षकार म्हणुन दाव्यात सामील केलेले नाही. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही पुर्वी वनविभाग यांच्या मालकीची होती. जिल्हाधिकारी यांच्या आदेश क्र. १३४२/२०१८ हा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादी हा दावा मिळकत वनजमिन अतिक्रमण म्हणुन कधीच खेडत नव्हते. वास्तविक पाहता प्रतिवादी हे दावा मिळकतीवर पुर्वापारपासुन मालक व कब्जेदार आहेत. शिर्वे गावाचे वनहक्क दावे हे २००८ ते २०११ दरम्यान मंजुर झाले असतांना;सन २०१८ मध्ये कोणतेही चौकशी नसतांना वादीचा लाभात वनहक्क दावा नेमका कोणता आधारे मंजुर झाला हे वादीने स्पष्ट केलेले नाही. वादीने अतिक्रमण धारक म्हणुन बनावट कृत्य करुन केवळ शासन दप्तरी लाभ घेता यावा म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादीस प्रथम दर्शनी कथन नसल्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

**५.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकले, अभिलेखाचे तसेच दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. वरील सर्व बाबी तसेच अर्ज व खुलासा वाचुन खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी त्यापुढे दिले असुन, खाली कारणमिमांसा केलेली आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांना प्रथमदर्शनी कथन आहे काय? | होय. |
| २ | न्यायाच्या समतोलत्वाचा कल वादी यांच्या बाजूने आहे काय? | होय. |
| ३ | अर्ज मंजूर न झाल्यास वादीचे पैशांमध्ये कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल काय? | होय. |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. वादी यांनी सदर अर्जाच्या समर्थनार्थ दावा मिळकत खासरा खंड क्रं. ४४५ ची मुळ ताबा पावती,पोलीस निरीक्षक यांना दिलेला तक्रारी अर्ज इ. दस्त दाखल केले आहे. याउलट प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ वनहक्क समिती यांनी दिलेले दाखले दाखल केले आहे. तसेच भरतसिंग गवल्या वसावे यांचे शपथपत्र (नि.क्रं.१७) दाखल केले आहे.

**मुद्दा क्रं. १ करीताः-**

७. सदरचा अर्ज निश्चित करतेवेळी सर्वप्रथम वादींनी केलेले कथन तसेच अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. वादी तर्फे दाखल वन जमीन मालकी हक्क ताबा पावतीचे अवलोकन केले असता वनहक्क धारक म्हणुन मनिलाल रुपसिंग राउळ तसेच त्यांच्यासह इतर लोकांच्या नावांचा उल्लेख वन हक्क धारक म्हणून खासरा खंड क्रमांक ४४५ वर असल्याचे स्पष्ट होते. सदरचा वनहक्क ताबा

पावती/मालकी हक्कपत्रकाचे अवलोकन केले असता दि. १९.०९.२०१८ रोजी वनहक्क त्रिस्तरिय समिती यांनी खासरा खंड क्रमांक ४४५ वादीस प्रदान केल्याचे स्पष्ट होते. वादीने केलेले कथन पाहता वनदावा मंजुर होवुन दि.१९.०९.२०१८ रोजी सदरची दावा मिळकत ही वादी यांना मिळाल्याचे स्पष्ट होते.

८. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी हा दावा मिळकतीची प्रत्यक्षपणे खेडपेड करुन उपभोग देखील घेत नव्हता; शिर्वे गावातुन वनहक्क दावे हे सन २००८ ते २०११ या कालावधीत मंजुर झाले असतांना सन २०१८ मध्ये नेमका कोणत्या आधारे वादीस वनदावा मंजुर झाला याचे स्पष्ट कथन वादीने केलेले नाही. त्यानुसार प्रतिवादी यांनी अभिलेखावर वनहक्क समिती मार्फत देण्यात आलेले दस्त दाखल केले आहे. परंतु सदरचे दोन्ही दाखले हे दि. ०८.०८.२०२३ रोजीचे असुन मणिलाल रुपसिंग राउळ यांचे नेमका कोणत्या मिळकतीवर अतिक्रमण नसून शासनाकडे नेमका कोणत्या मिळकतीबाबत प्रस्ताव नाही; तसेच अतिक्रमण धारक म्हणुन प्रतिवादी मगन पितांबर राउळ यांचा नेमका कोणत्या मिळकतीवर कब्जा/ताबा आहे हे अचुकपणे नमुद केलेले दिसुन येत नाही. वरील दोन्ही दाखले हे अत्यंत मोघम स्वरुपाचे असुन प्रत्यक्षात दावा मिळकती संबंधी सदर दाखले देण्यात आले याचा बोध होत नाही.

९. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादीने दावा मिळकती संबंधी बनावट आदेश तयार करुन दावा मिळकतीवर स्वतःचे नाव लावुन घेतले. परंतु दावा मिळकतीवर वादीचा

ताबा नाही हे दर्शविण्यासाठी प्रतिवादीने कोणताही प्रथम दर्शनी पुरावा दिलेला नाही. वादीने वनजमीन अतिक्रमण धारक म्हणुन खेडली नाही याबाबत प्रतिवादीने केवळ विधाने केलेले दिसुन येतात. शिर्वे या गावाचे वनहक्क दावे सन २००८ ते २०११ मध्ये मंजुर झालेले आहेत. सन २०१८ मध्ये कोणताही वनदावा मंजुर झालेला नाही अशी प्रतिवादीने केवळ कथने केलेली असुन सदर वनदावा हा सन २०१८ मध्ये मंजुर झालेला असतांना प्रस्तुतचा दावा दाखल करे पावेतो कोठेही तक्रार अर्ज तथा आक्षेप नोंदविला दिसुन येत नाही. दावा मिळकत ही प्रत्यक्षात जरी वनजमीन असली तरीही वादीने सदर योग्य त्या कागदपत्रंची पुर्तता केल्यानंतर वनदावा मंजुर होवुन त्यांच्या लाभात वनजमीनीचा मालकी हक्क दर्शविणारा दस्त योग्य त्या तत्सम त्रिस्तरीय समितीने दि. १९.०९.२०१८ रोजी वादीच्या लाभात दिल्याचे स्पष्ट होते .

१०. सन २०१८ पासुन दावा मिळकत ही वादींच्या नावे नोंद असतांना प्रतिवादींनी विनाकारण वादीच्या ताब्याला अडथळा निर्माण केल्यामुळे प्रस्ततुचा अर्ज केल्याचे स्पष्ट होते. आजरोजी दावा मिळकत ही वादीच्या नावे नोंद असुन ती प्रथम दर्शनी मालकी हक्क या नात्याने वादीची असल्याचे स्पष्ट होते. अर्जाचे स्वरुप पाहता दावा मिळकतीवर वादीच्या ताबा आहे किंवा नाही हि बाब याठिकाणी महत्वाची आहे; संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीचा दावा मिळकतीवर प्रत्यक्षात ताबा नाही हे दर्शविणारा एकही प्रथम दर्शनी पुरावा प्रतिवादीने अभिलेखावर दिलेला नाही. परंतु प्रतिवादीने दिलेल्या साक्षीदाराच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता साक्षीदाराने त्यांची

व प्रतिवादीची जमीन एकाच वनजमीन कुप क्रं. ४४५ मध्ये असुन शासनाकडुन सन २००८ ते २०११ या कालावधीत वनदावे मंजुर करण्यात आल्याचे कथन केले आहे तर वादी यांना कधीही कुप क्र. ४४५ मध्ये वनहक्क नव्हता. त्यांनी वादीला कधीही दावा मिळकतीची खेडपेड करतांना पाहिले नाही असे नमुद केले आहे. सदर साक्षीदाराच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता ते शिर्वे गावातील असल्याचे स्पष्ट होते. परंतु प्रत्यक्षात ते प्रतिवादी यांचे शेतशेजारी असुन त्यांची शेती देखील कुप क्रं. ४४५ मध्ये आहे हे दर्शविण्यासाठी प्रतिवादीने त्यांच्या सातबारा उता–याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतचे साक्षीदार हे खासरा खंड क्र. ४४५ मधील शेती असणारे साक्षीदार आहेत ही बाब स्पष्ट होत नाही. प्रतिवादीने त्यांच्या समर्थनार्थ एकही दस्त दाखल केलेले नाही. प्रतिवादी तर्फे दाखल दोन्ही दाखल्यांचे अवलोकन केले असता ही प्रत्यक्षात दावा मिळकतीशी संबंधीत आहे किंवा नाही याचा बोध होत नाही; त्यावर दावा मिळकतीचा उल्लेख देखील केलेला नाही. प्रतिवादी हे अतिक्रमण धारक आहे किंवा नाही याबाबत प्राथमिक पुरावा किंवा कागदपत्रे प्रतिवादीने दाखल केलेली नाही.

**११.** प्रस्तुतचा अर्ज निश्चित करतांना प्रतिवादी यांनी वादी यांच्या शांततापुर्ण ताब्याला अडथळा निर्माण केला किंवा नाही ही बाब पाहणे आवश्यक आहे. आज रोजी दावा मिळकत ही प्रत्यक्षपणे वादी यांच्या नावे नोंद असल्याचे स्पष्ट होते. जरी २०१८ च्या पुर्वी वनदावा मंजुर होण्याच्या आधीचे दावा मिळकती संबंधी वादीने एकही दस्त दाखल केले नसले तरीही आज रोजी दावा मिळकत ही प्रत्यक्षात वादीच्या नावे असल्याचे सिध्द

होते. वनहक्क ताबा पावती/मालकी हक्कपत्रकाचे अवलोकन केले असता तो सार्वजनिक दस्त असुन सदर दस्तांच्या नोंदींना महाराष्ट्र महसुन अधिनियम कलम १५७ प्रमाणे महत्व (Presumptive Value) असुन भारतीय पुरावा कायदा कलम ११४ प्रमाणे गृहीतक (Presumptions as to correctness) आहेत. म्हणुन सदरील दस्त हा योग्य त्या कागदपत्रांची पडताळणी करुन वादीच्या लाभात मंजूर करण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दावा मिळकतीचे मालक हे वादी असल्याचे प्राथमिकपणे स्पष्ट होते. सदर नोंदींचे अवलोकन केले असता सदर नोंदींना प्रतिवादींनी आजपावेतो कोठेही हरकत तथा आक्षेप घेतल्याचे स्पष्ट होत नाही. अशा परिस्थीतीत वादींनी केलेल्या कथानांना वजन प्राप्त होते. त्यामुळे आजरोजी वादींचा मालकी हक्क संरक्षीत करणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेशिका ३९ नियम १ व २ मधील बाबी प्रथमदर्शनी वादीने स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**१२.** कोणत्याही स्वरुपाचा मनाई हुकूम मिळण्यासाठी पक्षाला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेशिका ३९ नियम १ व २ मधील बाबी प्रथमदर्शनी स्पष्ट करणे आवश्यक असते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ३९ नियम १ व २ प्रमाणे अर्ज निश्चीत करतेवेळी नेहमी उद्भवणा-या शक्यतेच्या तत्वाच्या आधारे (preponderance of probability) अर्ज निश्चीत केल्या जातो. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेशिका ३९ नियम १ व २ नुसार,

*'' एखाद्या दावा मिळकतीवरील हक्काला वा ताब्याला जर नुकसान होण्याची किंवा ती गैर कायदेशीरपणे हस्तांतर होत असल्याची भिती असेल त्यावेळी मनाई हुकूम दिला जावू शकतो. तसेच प्रतिवादी जर **वादीच्या मिळकतीच्या कायदेशीर मालकी व ताब्याला** हस्तांतरण करुन अडथळा निर्माण करीत असेल अशा परिस्थीतीत मनाई हुकूम हा तात्पुरत्या किंवा निरंतर स्वरुपात देण्याची तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार वादीच्या कायदेशीर मालकी व ताब्याला संरक्षित करता येते.''*

**१३.** प्रस्तुतच्या अर्जात वादीने सदर बाबी या पुर्णतः स्पष्ट केलेल्या आहेत. वास्तविक पाहता, आज रोजी दावा मिळकत हि प्रत्यक्ष वादीच्या कब्जात आणि उपभोगात नाही ही बाब प्रतिवादीने तोंडी अथवा कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्याच्या आधारे खोडून काढलेली नाही. अशा परिस्थीतीत वादी हे दावा मिळकतीचे प्रत्यक्ष मालक व कब्जेदार आहेत ही बाब प्राथमिकपणे स्पष्ट होते. त्यामुळे वादीचे कथन हे प्रथम दर्शनी आहे हे सिध्द होते. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ ते ४ करीता** :–

**१४.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, आज रोजी दावा मिळकतीचे वादी हे प्रत्यक्षात मालक व काबीज असल्याचे प्रथम दर्शनी स्पष्ट होते. तसेच वादी यांना उपजिविकेचे दुसरे पर्यायी साधन नाही; वादी हे सदर दावा मिळकतीची खेडपेर तथा मशागत करुन उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर केल्यास आजरोजी वादींचे कधीही पैशांच्या स्वरुपात न भरून येणारे नुकसान होण्याची शक्यता या ठिकाणी नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायाचे समतोलत्व देखील वादीच्या दिशेने असल्याचे स्पष्ट होते. याउलट वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे

कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्याची शक्यता नाही. आज रोजी प्रतिवादींच्या कृत्यावर निर्बंध न घातल्यास वादींचे पैशांमध्ये कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक ठरते. म्हणुन मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे. मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज (निशाणी क्रमांक ५) मंजूर करण्यात येतो.

२. याव्दारे प्रतिवादींना आदेश करण्यात येतो की, त्यांनी तसेच त्यांचे सदस्य, नौकर, चाकर, नॉमीनीज, वाली, वारस तसेच प्रतिवादी यांनी स्वतः सदर दावा मिळकतीवरील वादींच्या मालकी,ताब्याला तसेच प्रत्यक्ष कब्जे उपभोगास कोणत्याही मार्गाने हस्तक्षेप तथा अडथळा करु नये अशी ताकीद तुर्तातुर्त मनाई हुकूमाने प्रतिवादींना देण्यात येते.

३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

SUVIDHA KRISHNARAO YAWALKAR

Digitally signed by SUVIDHA KRISHNARAO YAWALKAR
Date: 2023.09.11 17:34:21 +0530

**(सुविधा ग. पांडे/यावलकर)**

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तळोदा

ता. तळोदा जि. नंदुरबार

तळोदा

दिनांक :११.०९.२०२३.

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणीत करीतो की, सदर पी. डी. एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :— कल्पक वसंत पिंगळे

न्यायालयाचे नाव :— दिवाणी न्यायालय क.स्तर, तळोदा, जि.नंदुरबार

आदेश जाहीर केल्याची तारीख :— ११.०९.२०२३

आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख :— ११.०९.२०२३

आदेश अपलोड केल्याचा तारीख :— ११.०९.२०२३

स्वाक्षरी/—
(कल्पक वसंत पिंगळे)
लघुलेखक (श्रेणी—३)